परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी – ४११०१८

क्र.मातवि/ ४ /कावि/१८/२०२१
दिनांक-२७ / ८ /२०२१

प्रति,
सर्व संबंधित विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११०१८

**विषय:- मनपा संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेबाबत...**

**संदर्भ:- १) श्री.विशाल तुळशीराम मिठे यांचे दिनांक १७/०२/२०२१ रोजीचे पत्र.**
**२) माहिती तंत्रज्ञान विभागाकडील परिपत्रक**
क्र.मातवि/८/कावि/२५/२०२१, दिनांक- ०८/०३/२०२१
३) पीसीसी-२०२१/स.क्र.८६२/नवि-२२, दिनांक१४/०७/२०२१

उपरोक्त संदर्भिय क्र. १ चे पत्रान्वये श्री. विशाल तुळशीराम मिठे यांनी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम(६०) मधील तरतुदीनुसार मनपातील विविध विभागांनी मनपा संकेतस्थळावर माहितीचे प्रकटीकरण करणे तसेच विविध माहिती (उदा. निविदा, कोटेशन, कामाचे आदेश,करारनामा, अंतर्गत परिपत्रके, RTI बाबतची माहिती, विभागाशी संबंधित विविध माहिती ) प्रसिद्ध / अद्ययावत करणे आवश्यक आहे. तथापी काही विभागांकडुन सदरची माहिती प्रसिद्ध / अद्ययावत केली जात नाही अशा विभागांमधील विभागप्रमुखांवर योग्य ती कारवाई करणेबाबत कळविणेत आलेले होते.

त्याअनुषंगाने संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये सर्व संबंधित विभागांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे संकेतस्थळावर नागरिकांना मनपाचे विविध विभागांची माहिती सहजपणे उपलब्ध होणेकामी माहितीचे प्रकटीकरण तसेच निविदा, कोटेशन, कामाचे आदेश,करारनामा, अंतर्गत परिपत्रके, RTI अंतर्गत कलम-४ नुसार प्रसिद्ध करावयाची माहिती तसेच विभागाशी संबंधित विविध प्रसिद्ध करावयाची माहिती त्वरित प्रसिद्ध / अद्ययावत करणेकामी कळविणेत आलेले होते.

बहुतांश विभागांनी तद्नंतरही आपले विभागाशी संबंधित माहिती मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध / अद्ययावत न केल्यामुळे संबंधितांनी दि. ०५/०७/२०२१ रोजी आपले सरकार अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ ची अंमलबजावणी करीत नसल्याबाबत तसेच कामकाजाची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध /अद्ययावत करत नसलेबाबतची तक्रार केल्याबाबत उपरोक्त संदर्भिय क्र. ३ अन्वये नगरविकास विभागाकडील पत्रान्वये कळविलेले असुन त्याअनुषंगाने उचित कार्यवाही करुन संबंधित तक्रारदार यांना कळविणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

तरी सदर परिपत्रकान्वये सर्व संबंधित विभागांना कळविणेत येते की आपण आपले विभागाशी संबंधित मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली सर्व माहिती **(उदा. निविदा, कोटेशन, कामाचे आदेश,करारनामा, अंतर्गत परिपत्रके, RTI अंतर्गत कलम-४ नुसार प्रसिद्ध करावयाची माहिती, विभागाशी संबंधित प्रसिद्ध करणेत आलेली विविध माहिती )** तपासुन त्यामध्ये काही बदल असल्यास त्वरित बदल करुन माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेत यावी.

तसेच सदरची माहिती विनाविलंब अपलोड / अपडेट करणेकामी सर्व संबंधित विभागांना प्रशिक्षण देऊन लॉगिन, पासवर्ड यापुर्वीच देणेत आलेले आहेत. सदरबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे संपर्क साधुन पुन:श्च प्रशिक्षण घेऊन उपरोक्त माहिती त्वरित प्रसिद्ध / अद्ययावत करुन त्याबाबतचा अहवाल **दिनांक ०६/०९/२०२१** पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभागामध्ये सादर करणेत यावा. अहवाल वेळेत सादर न करणा-या विभागांची माहिती मा. आयुक्तसो. यांचे निदर्शनास आणुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तरी सर्व संबंधित विभागांनी उपरोक्त माहिती तातडीने / विनाविलंब प्रसिद्ध / अपडेट करुन अहवाल वेळेत पाठविणेची दक्षता घ्यावी.

मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

सोबत – संदर्भिय पत्र.

नासुके १८०२/२०२१ दि-२१/८/२१

माहिती व तंत्रज्ञान विभाग
आवक क्रमांक ३१८१
दिनांक २५/८/२०२१
टेबल क्रमांक श्रीम अडूरकर
लिपिक
मु. लिपिक
कार्या. अधिकारी
माहिती व तंत्रज्ञान अधिकारी

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), ४ था मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२७९४२०७
Email ID : dilip.vanire@nic.in

क्रमांक : पीसीसी-२०२१/सं.क्र.८६२ /नवि-२२ दिनांक :१४/०७/२०२१

**प्रति,**
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-४११०१८

**विषय :** आपले सरकार वरील Dept/URDM/२०२१/१६८१९, दिनांक ०५.०७.२०२१ रोजीच्या तक्रारीबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयासंबंधात श्री.विशाल मिथे(Vishal Mithe) यांची Dept/URDM/२०२१/१६८१९, दिनांक ०५.०७.२०२१ रोजीच्या आपले सरकार वरील प्राप्त तक्रारीची प्रत सोबत जोडली आहे.

२. श्री.मिथे यांनी "पिंपरी चिंचवड महानगरपालिका माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ४ ची अंमलबजावणी करीत नसल्याबाबत तसेच कामकाजाची माहिती संकेतस्थळावर अपडेट करत नसल्याबाबत" तक्रार केलेली आहे. माहिती अधिकारातील तरतूदींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही केली नसल्यास त्याअनुषंगाने तपासून पुढील उचित कार्यवाही तातडीने करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास कळविण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(दिलीप आ. वणिरे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

नागरी सुविधा केंद्र

| | |
|---|---|
| आवक क्रमांक | ४७२ |
| दिनांक | २४/८/२१ |
| टेबल क्रमांक | २ |
| लिपिक | |
| लेखापाल / मुख्य लिपिक | |
| मा. व तं. अधिकारी | |
| मुख्य मा. व तं. अधिकारी | |

सोबतचे वरीलप्रमाणे

**प्रशासन विभाग**
**पिं.चिं.मनपा. पिंपरी-१८.**

| **पोस्टाचे टपाल** | |
|---|---|
| **दिनांक** | 09 AUG 2021 |
| **आवक क्रमांक** | ४७७ |
| **विभाग** | नासुके |
| **लिपिक** | |
| **मु. लिपिक** | |
| **प्रशासन अधिकारी** | २ |
| **सहा. आयुक्त प्रशासन** | |
| **उप आयुक्त प्रशासन** | |
| **अति.आयुक्त** | ३ |
| **आयुक्त** | २ |

१) I.T. विभाग

जा.क्र. ८४२/
१३/०७/२०२१

१/प.वि

# तक्रार निवारण प्रणाली
महाराष्ट्र शासन

आपले सरकार

गृह Vishal mithe

## Dept/URDM/2021/16819

### तक्रारीची माहिती

| | |
|---|---|
| टोकन आयडी | Dept/URDM/2021/16819 |
| सादर करण्याचा दिनांक | 5, July 2021 |
| स्थिती | वाटप |

### अर्जदाराची माहिती

| | |
|---|---|
| नाव | Vishal mithe |
| मोबाईल क्रमांक | 8007828674 |
| मेल आईडी | mithevishal1990@gmail.com |
| जिल्हा | पुणे |
| तालुका | मुळशी |

### प्रशासन तपशील

| | |
|---|---|
| प्रशासन स्तर | मंत्रालय |
| विभाग | नगर विकास २ - नागरी स्थानिक स्वराज्य संस्था |

### तुमची तक्रार

| | |
|---|---|
| तक्रारीचे स्वरूप | राज्यातील महानगर पालिका- प्रशासकीय बाबी |
| तक्रार | पिंपरी चिंचवड महापालिका माहिती अधिकार अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम -४ ची अंमलब जावणी करत नाहीत.अनेक विभाग त्यांच्याकडील कामकाजाची माहिती संकेतस्थळावर अपडेट करत नाहीत.याबाबत मा.आयुक्त यांना पत्रव्यवहार करुनही काहीच उपयोग झाला नाही. |

### तक्रार निवारण

बदला स्थिती * - निवडा स्थिती -  टिप्पणी भाषा: - भाषा निवडा -

Comment By UD2-Urban Local Bodies ( July 13, 2021 12:07 PM ) : Forwarded for necessary action.

टिप्पणी *

दस्तऐवज अपलोड करा
फाईल्स २ एमबी पेक्षा कमी असाव्यात.
मान्य फाईल प्रकार: pdf jpg png.

Choose File No file chosen

| | | | | |
|---|---|---|---|---|
| nodalurdm | urdm.ds3 | Assigned | July 13, 2021 12:07 pm | Forwarded for necessary action. |

भेट देणारे statcounter
पृष्ठ नवीनता: 13/07/2021

12:11 89%

# तक्रारीचा तपशील

**टोकन आयडी:** Dept/URDM/२०२१/१६८१९

**विभाग:** नगर विकास २ - नागरी स्थानिक स्वराज्य संस्था

**तक्रारीचे स्वरूप:** राज्यातील महानगर पालिका- प्रशासकीय बाबी

**स्थिती:** Submitted

०७-०५-२०२१

**तुमची तक्रार:**

पिंपरी चिंचवड महापालिका माहिती अधिकार अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम -४ ची अंमलबजावणी करत नाहीत.अनेक विभाग त्यांच्याकडील कामकाजाची माहिती संकेतस्थळावर अपडेट करत नाहीत.याबाबत मा.आयुक्त यांना पत्रव्यवहार करुनही काहीच उपयोग झाला नाही.